प्रेस नोट दि - १४/०९/२०१८

## कृषी शाखेच्या चौथ्या वर्गात शिकणा-या सुशिक्षित मुलांकडुन वाहनचोरीचे गुन्हे उघड साडेपाच लाख रुपये किंमतीच्या बारा मोटार सायकली हस्तगत

संघटीत गुन्हेगारी प्रतिबंधक पथक पश्चिम विभाग, गुन्हे शाखा, पुणे शहर कडील पोलीस अधिकारी व कर्मचारी कर्तव्यावर हजर असताना पोलीस हवालदार संतोष क्षीरसागर यांना त्यांचे खबर-याकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की अमरनाथ घुलेश्वर रा- सावर्डे चिपळुन जिल्हा रत्नागिरी हा दुचाकी वाहन चोरीचे गुन्हे करत असतो व त्याने अशाप्रकारे पुणे शहर व इतर परिसरातुन अनेक दुचाकी वाहने चोरली असुन त्या वाहने विकली आहेत. अशी खात्रीशीर माहीती मिळाल्यावरुन पोलीसांनी सावर्डे चिपळुन जिल्हा - रत्नागिरी याठिकाणी त्याचेबाबत माहीती काढुन संशयीत इसम अमरनाथ ज्ञानदेव घुलेश्वर वय–२१ रा-मुपो खळी ता–गंगाखेड जिल्हा–परभणी यास दिनांक–१०/०९/२०१८ रोजी ताब्यात घेण्यात आले व गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे. त्याचेकडे बारकाईने सखोल तपास केला असता त्याने पुणे शहरामध्ये कोंढवा, हडपसर, कात्रज, देहु रोड या परिसरात तसेच सायन मुंबई, पनवेल, ठाणे या भागातुन दुचाकी वाहन चोरीचे पंचेचाळीस पेक्षा जास्त गुन्हे केल्याची माहीती दिली आहे. तो चोरी केलेल्या दुचाकीने बायरोडने चिपळुन रत्नागिरी येथे जात होता व त्याठिकाणी वाहनाची विक्री करत होता. वाहन विकताना कोणी कागदपत्राची मागणी केल्यास त्यांना कागदपत्र हरवल्याचे किंवा नंतर देतो असे सांगत होता. **अशाप्रकारे त्याने चोरलेली एक हिरो होंडा सीबीझेड, दोन हिरा इग्नेटर, चार हिरो होंडा स्प्लेंडर, तीन हिरो होंडा पॅशन प्रो , दोन हिरो युनिकॉर्न अशा एकुण बारा मोटार सायकली साडे पाच लाख रुपये किंमतीच्या जप्त करण्यात आलेल्या आहे. त्याचेकडुन कोंढवा पोलीस स्टेशन कडील एक, स्वारगेट पोलीस स्टेशन कडील एक, देहु रोड पोलीस स्टेशन कडील एक, पनवेल सिटी पोलीस स्टेशन नवी मुंबई कडील चार, पाटण पोलीस स्टेशन सातारा कडील दोन , वागळे इस्टेट पोलीस स्टेशन जिल्हा ठाणे कडील दोन व सायन पोलीस स्टेशन मुंबई कडील एक असे एकुण बारा गुन्हे उघडकीस आलेले आहे.**

श्री रमेश ईश्वर माटले वय - ३२ रा – तळवडे पार्क निघोजे खेड जिल्हा पुणे यांनी त्यांची हिरो इग्नेटर मोटार सायकल नंबर एमएच१४/ईडी०८५२ दिनांक – ०६/०६/२०१८ रोजी रात्रौ ११/०० स्वारगेट एसटी स्टँड रिझर्व्हेशन ऑफीस समोर कुलुप लावुन पार्क केली होती ती आरोपीने चोरल्याचे उघडकीस आलेले आहे त्यांची मोटार सायकल जप्त करण्यात आलेली आहे त्यांनी त्याबाबत स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे येथे तक्रार दिलली आहे.

आरोपी हा नामांकित कृषी विदयापीठ मध्ये चौथ्या वर्षात शिक्षण घेत आहे. तो डयुप्लीकेट चावीने कुलुप उघडुन चोरी करत असे त्याचे जवळ आठ बनावट चाव्या मिळाल्या आहेत . आरोपीने दुचाकी वाहने चोरल्यानंतर तो त्यांचा मुळ नंबर त्याचे मोबाईल मधील वहान इन्फो या ॲपवर टाकुन वाहनांची माहिती मॅन्युफॅक्चरिंग वर्ष इत्यादी घेत असे व त्याच मॅन्युफॅक्चरिंग वर्षाची गाडी व त्याच कंपनी व मेकची गाडी ओएलएक्स या ॲप्लीकेशन वर विकीसाठी असल्याची माहीती काढुन विकीस असलेल्या वाहनाचा नंबर चोरलेल्या वाहनावर टाकुन त्या वाहनाची विक्री करत असे त्याने अशा ब-याच वाहनांची सुमारे एक वर्षापासुन चोरी करत आहे काही वाहने त्याने पेट्रोल संपल्याने त्याचठिकाणी सोडुन दिलेली आहे तसेच वाहन चोरताना सीसीटिव्हि फुटेज आल्यास ते वाहन देखील सोडुन देत होता असे तपासात निष्पन्न झाले आहे.

आरोपी याने अशाप्रकारे आणखी वाहनचोरीचे गुन्हे केले आहेत काय ? त्याचे इतर कोणी साथीदार आहे काय ? याबाबत तपास करणेकामी त्यास न्यायालयात हजर करण्यात आले त्यावेळी सरकारी वकील संजय दिक्षीत यांनी आरोपीची तपासकामी पोलीसा कोठडी मिळणेची मागणी केली होती मा. श्रीमती एस . एस . मतकर प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी आठवे न्यायालय पुणे यांनी आरोपीस दिनांक–१५/०९/२०१८ रोजी पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत. पुढील तपास पोलीस उप निरीक्षक संजय गायकवाड हे करीत आहेत.

**सदरची कामगिरी गुन्हेशाखा, पुणे शहराचे श्री. प्रदिप देशपांडे अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. शिरीष सरदेशपांडे, सो, पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री. समीर शेख स.पो.आ. गुन्हे - १ पुणे यांचे मार्गदर्शनाखाली गुंडा स्कॉड पश्चिम विभागाचे पोलीस निरीक्षक श्री. राम राजमाने, पोलीस उप निरीक्षक श्री. संजय गायकवाड,उत्तम बुदगुडे आणि पोलीस कर्मचारी संतोष क्षीरसागर, सर्फराज शेख, पशांत पवार, शकील शेख, सुनिल चिखले, निलेश शिवतरे, रमेश चौधर, विजय गुरव, राकेश खुणवे, किरण ठवरे, प्रविण पडवळ, कैलास साळुके, संभाजी गंगावणे यांनी केली आहे.**

रुप. कॉन्स्टेबल - राजेंद्रसिंग चौहान


क्राईम ब्रँच
(गुंडाविरोधी पथक - दक्षिण विभाग)
पुणे शहर
ॲन्टी ऑर्गनाईज्ड क्राईम सेल साऊथ रिजन [AOCC]
फोन नं. ०२० २६२०८२९५ / २६२०८२९५